वाचले :-

१) मा.आयुक्त सो. यांची दिनांक - ०३/०१/२०२२ रोजीची बैठक.
२) "महर्षी वाल्मिकी महिला बचत गट" यांचे नोदणी क्र. १८८४३ यांचे दिनांक - २८/११/२०२२ रोजीचे पत्र.
३) CTO कार्यालयाचा दिनांक – ०७/०३/२०२२ रोजीचा मेल.
४) स्वच्छ महाराष्ट्र/भारत अभियान कक्षाकडील आदेश क्र. स्वमअक/३/कावि/१५७/२०२३ दि. १८/१०/२०२३
५) कामकाज आदेश क्र. अक्षेका/आ/२/कावि/३२७/२०२३ दि. ०१/०६/२०२३
६) महर्षी वाल्मिकी महिला बचत गट" यांचे मुदतवाढ मिळणेबाबतचे दि.१३/१२/२०२३ चे पत्र
७) मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. ०८/०१/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.
८) मा. स्थायी समिती ठराव क्र. २९१३ दि. ३०/०१/२०२४
९) कामकाज आदेश क्र. अक्षेका/आ/२/कावि/१०८/२०२४ दि. २२/०२/२०२४
१०) महर्षी वाल्मिकी महिला बचत गट" यांचे मुदतवाढ मिळणेबाबतचे दि.१४/०५/२०२४ चे पत्र
११) मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. ०५/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.
१२) मा. स्थायी समिती ठराव क्र. ३७९४ दि. ३०/०७१/२०२४
१३) कामकाज आदेश क्र. अक्षेका/आ/२/कावि/५३५/२०२४ दि. २७/०८/२०२४
१४) महर्षी वाल्मिकी महिला बचत गट" यांचे मुदतवाढ मिळणेबाबतचे दि.१४/०५/२०२४ चे पत्र
१५) मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. ०५/०७/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.
१६) मा. स्थायी समिती ठराव क्र. ३७९४ दि. ३०/०७१/२०२४
१७) मा. क्षेत्रीय अधिकारी यांचा दि१२/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग
क्र. अक्षेका/आ/२/कावि/९३५/२०२५
दिनांक - १२/०२/२०२५

**विषय – मे. "महर्षी माल्मिकी महिला बचत गट" यांचे सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्वच्छता व देखभाल - दुरुस्तीचे कामास मुदतवाढ देणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल दुरुस्तीची कामे स्वच्छ सर्वेक्षणाची परिणामक्ता वाढविण्याचे दृष्टीने लोकांच्या मानमिकतेत बदल करणे करीता, महिला सक्षमीकरण व लोकांनी सहभागी होणेकरीता मा.आयुक्त सो. यांनी वाचले क्र. १ अन्वये शौचालय साफसफाईच्या कामामध्ये नागरीकांना ओनरशिप पार्ट देणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच वाचले क्र. २ अन्वये "महर्षी वाल्मिकी महिला बचत गट", लिंक रोड, पत्राशेड, पिंपरी, पुणे - १८ यांनी काम करण्यास तयार असले बाबतचे पत्र दिलेले आहे. वाचले क्र. ३ अन्वये CTO कार्यालयाने मेलव्दारे प्रति माह प्रति सिट खर्चाची रक्कम कळविलेली आहे. तदनंतर सदर रकमेमध्ये ९००/- ऐवजी र.रू. १०००/- प्रति माह प्रति सिट्स वाढ करणेस व त्यापुढील प्रत्येक वर्षी माहे. एप्रिलमध्ये सदर रकमेमध्ये १०% वाढ करणेस स्वच्छ महाराष्ट्र/भारत अभियान कक्षाकडील वाचले क्र. ४ अन्वये आदेश निर्गत केला आहे.

त्यानुषंगाने "महर्षी वाल्मिकी महिला बचत गट", लिंक रोड, पत्राशेड, पिंपरी, पुणे - १८ या बचत गटाला प्रभाग क्र. १९ मधील खालील तक्त्यामध्ये नमुद सार्वजनिक शौचालय साफसफाईच्या कामाची निविदा कार्यवाही न करता, थेट पध्दतीने प्रायोगिक तत्त्वावर अ क्षेत्रीय कार्यालयामार्फत स्वच्छता व देखभाल – दुरुस्तीसाठी दि. ०१/०६/२०२४ ते ३०/११/२०२३ या कालावधीमाठी वाचले क्र.५ अन्वये कामकाज देणेत आले होते.

| अ.क्र | शौचालय ठिकाण | ब्लॉक संख्या | सिट्स संख्या | | एकूण सिट्स | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्त्री | पुरुष | | |
| १ | परदेशी यांचे घराजवळ पत्राशेड, पिंपरी | १ | ५ | ६ | ११ | |
| | एकूण | १ | ५ | ६ | ११ | |

तदनंतर सदर कामाची मुदत दि. ३०/११/२०२३ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी सदर महिला बचत गटाने वाचले क्र. ६ चे पत्रान्वये सार्वजनिक शौचालय देखभाल दुरूस्तीचे कामकाज मिळणेकामी विनंती केली आहे. त्यास अनुसरून मा. आयुक्त सो यांनी सदर महिला बचत गटाला वाचले क्र. ७ चे प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. तसेच सदर बचत गटाच्या कामास येणा-या प्रत्यक्ष खर्चाला मा. स्थायी समिती यांचे अधिकारानुसार मा. प्रशासक यांनी वाचले क्र. ८ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर बचत गटाला दि.०१/१२/२०२४ ते ३१/०५/२०२४ या कालावधीसाठी वाचले क्र. ९ अन्वये कामकाज देणेत आले आहे.

तदनंतर सदर कामाची मुदत दि. ३१/०५/२०२४ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी सदर महिला बचत गटाने वाचले क्र. १० चे पत्रान्वये सार्वजनिक शौचालय देखभाल दुरूस्तीचे कामकाज मिळणेकामी विनंती केली आहे. त्यास अनुसरून मा. आयुक्त सो यांनी सदर महिला बचत गटाला वाचले क्र. ११ चे प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. तसेच सदर बचत गटाच्या कामास येणा-या प्रत्यक्ष खर्चाला मा. स्थायी समिती यांचे अधिकारानुसार मा. प्रशासक यांनी वाचले क्र. १२ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर बचत गटाला दि.०१/०६/२०२४ ते ३०/११/२०२४ या कालावधीसाठी वाचले क्र. १३ अन्वये कामकाज देणेत आले आहे.

तदनंतर सदर कामाची मुदत दि. ३०/११/२०२४ रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी सदर महिला बचत गटाने वाचले क्र. १४ चे पत्रान्वये सार्वजनिक शौचालय देखभाल दुरूस्तीचे कामकाज मिळणेकामी विनंती केली आहे. त्यास अनुसरून मा. आयुक्त सो यांनी सदर महिला बचत गटाला वाचले क्र. १५ चे प्रस्तावान्वये मान्यता दिली आहे. तसेच सदर बचत गटाच्या कामास येणा-या प्रत्यक्ष खर्चाला मा. स्थायी समिती यांचे अधिकारानुसार मा. प्रशासक यांनी वाचले क्र. १६ अन्वये मान्यता दिली आहे.

त्यानुसार सदर बचत गटाला दि. ०१/१२/२०२४ ते ३०/०५/२०२५ या कालावधीसाठी कामकाज देणेत येत आहे. सदर संस्थेला प्रति सिट मासिक खर्च र.रु. ११००/- प्रमाणे ११ सिट्स x ११०० = १२,१००/- ममिक व ४ महिने कलावधीकरीता ४८,४००/- व २ महिने कालावधीकरीता ११ सिट्स x १२१० = १३,३१०/- x २ महिने = २६,६२०/- प्रमाणे असे एकूण ६ महिने कालावधीकरीता र.रू. ७५,०२०/- + ५,०००/- आकस्मिक निधी असे एकूण र.रू. ८०,०२०/- ( अक्षरी र.रू. ऐंशी हजार वीस फक्त ) इतका खर्च होणार असून सदरचा खर्च आरोग्य विभागाकडील "खाजगीकरणाव्दारे साफसफाई" या लेखाशिर्षामधून करणेत येणार आहे.

अटी व शर्ती –

१. सदरचे कामकाज प्रायोगिक तत्वावर दि. ०१/१२/२०२४ ते ३०/०५/२०२५ अखेर ६ महिनेच्या कालावधीकरीता राहील.

Scanned with OKEN Scanner

२. राष्ट्रीय सफाई आयोगाच्या अनुषंगाने नियमांचे उल्लघंन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. (उदा. हाताने मैला काढणे,सुरक्षा सधनांचा वापर न करता काम करणे इ.)

३. पिंपरी चिंचवड मनपातर्फे कोणतेही साहित्य (३.५ लीटर बादली/मग, झाडू, टॉयलेट क्लिनिंग ब्रश, फ्लोअर वायपर व डस्टबिन) इत्यादीची व्यवस्था बचत गटाला स्वखर्चाने करावी लागेल.

४. साफसफाई करणेकरीता लागणारे इतर साहित्य (उदा. टॉयलेट क्लिनर, एसिड, साबण, पावडर, सुरक्षा साधने) इत्यादीची व्यवस्था मनपा मार्फत पुरविण्यात येईल.

५. सदरचे शौचालय हे नागरीकांना वापरण्यायोग्य सार्वजनिक शौचालये व मुता-यांची दिवसातुन ०३ वेळा स्वच्छता करावी लागेल व स्वच्छतेचा दर्जा उच्च प्रतीचा असला पाहिजे, जेणेकरुन ती नागरिकांचे वापरा योग्य राहतील.

६. जाळ्या/जळमटे, थुंकीचे डाग काढणे या शिवाय शौचालयाच्या बाहेरील, गवत, केरकचरा काढुन सदर परीसर व पाण्याच्या टाक्या कायम स्वच्छ राहतील याची दक्षता घ्यावी लागेल.

७. एखाद्या कर्मचाऱ्यास अन्य व्यक्तीस इजा, अपघात अथवा जिवीत किंवा वित्तहानी झालेस त्याची जबाबदारी मनपावर राहणार नाही व कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच मालमत्तेचे नुकसान झालेस त्याची संपुर्ण जबाबदारी बचत गटाची राहील.

८. सदर कामासाठी बाल कामगार तसेच वयोवृद्ध (वय वर्ष ६० पुर्ण असलेले) कामावर ठेवता येणार नाहीत.

९. स्वच्छतागृहे साफ करणेसाठी बचत गटामार्फत नियुक्त केलेल्या कामगारास म.न.पा. मध्ये नोकरीसाठी अथवा इतर कोणत्याही कायम कर्मचा-यांना लागु असणा-या सुविधांसाठी हक्क मांगता येणार नाही.

१०. बचत गटामार्फत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मासिक वेतन संबंधीत कामगारांच्या नांवे अंकाऊंट पे क्रॉस चेकने/इ.सी.एस./एन.इ.एफ.टी. व्दारे त्यांच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील. बचत गटाने याकामी राष्ट्रीयकृत बँकेत सर्व कर्मचा-यांचे नव्याने स्वतंत्रपणे खाते उघडणे व सर्व कामगारांचे वेतन त्याच खात्यातून देणे बंधनकारक आहे.

११. क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाकडील आरोग्य निरिक्षक, मुख्य आरोग्य निरिक्षक, सहा. आरोग्याधिकारी अथवा म.न.पा. ने नियुक्त केलेले अधिकारी /कर्मचारी यांचे सदर कामावर नियंत्रण राहिल. त्यांचे सुचनेनुसार कामकाज करावे लागेल. त्याचप्रमाणे म.न.पा. अधिका-यांनी वेळोवेळी भेटी दिल्यानंतर त्यांच्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहिल. तसेच संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक यांचा काम समाधानकारकरित्या पार पाडलेबाबत अहवाल प्राप्ती नंतर बील अदा केले जाईल.

१२. दैनंदिन कामात त्रुटी आढळलेस खालीलप्रमाणे दंड आकारुन त्याची देय बीलातुन वसुली करणेत येईल. शौचालय पॅन/मुतारी अस्वच्छ आढळुन आल्यास त्याबाबत प्रती सिट/मुतारी प्रती दिन र.रु.५०/- शौचालय पॅन/चेंबर चोकअप न काढलेस प्रती सीट प्रती दिन र.रु. ५०/- स्वच्छतागृह/मुतारीच्या परीसरात अस्वच्छता आढळुन आलेस प्रती ब्लॉक प्रतीदिन र.रु. ५०/-

(शितल वाकडे)
क्षेत्रीय अधिकारी
अ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी – ४११ ०४४

Scanned with OKEN Scanner